**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३१ फोन नं.०२०/२६१११५५३

क्रमांक : ममअ-ब/२०१८/२५-२६ एप्रिल/बैठक/प्रशा-१/ ६३३० दिनांक २४.०६.२०१९
24 JUN 2019

प्रति,

प्राचार्य / संचालक
सर्व शासकीय महाविद्यालये / शासकीय संस्था

**विषय : महाविद्यालयातील दैनंदिन अध्ययन, अध्यापन व संशोधन इत्यादीबाबत सादरीकरण.**

**संदर्भ :** सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई येथे दिनांक ०८ व ०९.०५.२०१९ रोजी झालेले सादरीकरण व आढावा बैठक.

महाविद्यालयातील दैनंदिन अध्ययन, अध्यापन व संशोधन यासंदर्भात सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई येथे मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेसमोर दिनांक ०८ व ०९ मे २०१९ रोजी झालेल्या सादरीकरण व आढावा बैठकीचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्तामध्ये आपल्या महाविद्यालय / संस्थांशी सबंधित मुद्यांवर आवश्यक ती कार्यवाही करुन कार्यपूर्तता अहवाल या संचालनालयाकडे पाठविण्यांत यावा.

( सुयश दुसाने )
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत : मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

| | | |
|---|---|---|
| | राहत नसल्याचे सांगितले, यासंदर्भात विद्यापीठाच्या अशा तरतूदींमध्ये साजेशे बदल करण्याबाबत विचार करण्यांत येईल.<br>• गणित व विज्ञान हे विषय जास्त लोकाभिमुख करण्याची गरज आहे.<br>• शासकीय संस्थांची प्रगती आलेख उंचावण्याकरीता विज्ञान संस्था, मुंबई यांनी पुढाकार घ्यावा.<br>• शासकीय महाविद्यालयांमध्ये सुरु असलेले विनाअनुदानित तत्वावरील कोर्सेस अनुदानावर आणण्यासाठी शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करावेत. | |
| | **IIT मुंबई येथील तज्ञ डॉ.तृप्ती मोरे यांनी Spoken Tutorial प्रकल्पासंबंधी सादरीकरण केले.**<br>• Spoken Tutorial Project is funded by National Mission on Education through ICT, MHRD, Govt. of India<br>• This is successful IT / Software training programme covering wide variety of courses imparting skills found in University Syllabus.<br>• मा.सचिव महोदयांनी शासकीय महाविद्यालयांनी सदर Courses सुरु करणेबाबत निर्देश दिले. कोर्स पूर्ण केल्यावर IIT, मुंबई यांचे प्रमाणपत्र मिळेल तसेच असे Courses करण्याची विद्यार्थ्यांना आवड देखील असते असे नमुद केले.<br>• सध्या बरेच विद्यार्थी हे कोर्सेस स्वतंत्रपणे वैयक्तिकरित्या करीत आहेत, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना विनामुल्य प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास फायदेशीर राहील.<br>• यासाठी प्रत्येक महाविद्यालयात एक शिक्षक Organiser म्हणून नेमता येईल.<br>• महाविद्यालयांनी सदर Courses साठी रु.२५०००/- खर्च करण्यासाठी परवानगी मिळणेस्तव प्रस्ताव सादर करावा, त्यास परवानगी देता येईल. | सर्व प्राचार्य संचालक |